सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - ०१/२०२४-२०२५

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.१०/०६/२०२४ रोजी दुपारी १२:३० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१३/०३/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महानगरपालिका क्षेत्रातील वारणाली वॉर्ड क्र.८ पाटबंधारे कार्यालय शेजारी सेंट्रल स्कुल मागे स.नं.१३५/अ/१ येथील मनपा ओपन स्पेस येथील विहिरीचे पाणी शेजारील श्री.वास्तुपूरम को ऑप सोसा.लि.सांगली यांना वैयक्तिक वापरासाठी महापालिका अटीनुसार दोन वर्षासाठीची प्रस्तावित केलेला दर रु.२/- प्रति युनिट प्रमाणे कमाल दोन वर्षाची (२४महिने) आकारणीची र.रु.१४,६००/- इतकी रक्कम आगाऊ भरणा करुन घेवून परवानगी देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.२४/०५/२०२४ चे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत नळ कनेक्शनबाबत आकारण्यात येणाऱ्या शास्तीमध्ये वाढ करण्यास मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.२९/०५/२०२४ चे विषयपत्र.**

४. महानगरपालिका क्षेत्रातील नविन पाणी नळ कनेक्शनसाठी आकारण्यात येणारे अनामत व जोडणी शुल्कामध्ये वाढ करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.०७/०६/२०२४ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराची रक्कम धनादेशाद्वारे भरताना न वठलेल्या प्रत्येक धनादेशास र.रु.५००/- मात्र दंड करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता व कर विभाग,सांगली) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर भरताना गो ग्रीन सुविधेचा लाभ घेण्यास नोंद करणाऱ्या मिळकतधारकांना देय रक्कमेत सवलत देणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता व कर विभाग,सांगली) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिका क्षेत्रातील इमारती मधील पार्किंग क्षेत्राची कर आकारणी ओपन प्लॉटच्या दराने घरपट्टी आकारणी करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (कर निर्धारण व संकलन विभाग) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्र.**

८. सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०२ कामांचा र.रु.३५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील स.नं.१/अ/४ब/४अ/१ या जागेचे भुसंपादनबाबत धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०७/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिका क्षेत्रातील जाहिरात फलकांची उभारणी फी, नुतनीकरण तसेच नविन जाहिरात फलकांना परवानगी आणि अनाधिकृत जाहिरात फलकांच्या दंडात्मक कारवाई करीता शुल्क निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे विषयपत्र.**

११. सांगली वाडी येथील स.नं.४२/१/अ/१ या जमिनीतील जागेचे ड्रेनेज पंपींग स्टेशनसाठी भूसंपादन करणेस धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१२. सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील LED प्रकल्प राबविणेकामी महानगरपालिकेकडील मानधन तत्वावरील २० कर्मचारी मे.समुद्रा इलेक्ट्रॉनिक्स सिस्टिम प्रा.लि. यांचेकडे वर्ग करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (विद्युत विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१३. दैनिक परवाना फी बाबतचा ई-लिलाव प्रसिध्द करणेसाठी देकार रक्कम निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१४. महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम MRDP या प्रकल्पाबाबत नविन लेखाशिर्ष तयार करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) यांचे विषयपत्र.**

१५. महानगरपालिकेच्या कर विभागाकडून शास्ती रक्कमेमध्ये यापुर्वी देणेत येणारी कायमस्वरुपी २५% सवलत बंद करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

१६. न्यू.प्राईड मल्टीप्लेक्स सांगली समोरील मा.आयुक्तसो यांचे बंगल्यास उर्जा बंगला असे नामकरणाचा प्राथमिक इरादा व स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिद्धीकरण करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०१ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१३/०३/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.९४ ते १०४ चे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०२ **दिनांक :-** १०/०६/२०२४

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.२४/०५/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील वारणाली वॉर्ड क्र.८ पाटबंधारे कार्यालय शेजारी सेंट्रल स्कुल मागे स.नं.१३५/अ/१ येथील मनपा ओपन स्पेस येथील विहिरीचे पाणी शेजारील श्री.वास्तुपूरम को ऑप सोसा.लि.सांगली यांना वैयक्तिक वापरासाठी महापालिका अटीनुसार दोन वर्षासाठीचा प्रस्तावित केलेला दर रु.२/- प्रति युनिट प्रमाणे कमाल दोन वर्षाची (२४महिने) आकारणीची रक्कम वार्षिक र.रु.१४,६००/- प्रमाणे आगाऊ भरणा करुन घेवून, परवानगी देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (पा.पु.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०३ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.२९/०५/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील नियमानुसार नागरिकांच्या मागणीनुसार पाणी कनेक्शन दिली जातात असे असतानाही बरेच नागरिक अनाधिकृतरित्या पाणी कनेक्शन जोडून घेतल्याचे निदर्शनास येत असून, अशा नळ जोडण्या तातडीने रितसर करणेबाबत महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान नागरी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा दि.१९ जून २०१० रोजीचा शासन निर्णय तसेच दि.२९ ऑक्टोंबर २०१५ चे शासन परिपत्रकास अनुसरुन मा.महासभा ठराव क्र.८७ दि.०१/०९/२०१६ अन्वये नियमितीकरण शुल्क सरासरी रु.३,०००/- (अनाधिकृत नळ जोडण्या योग्य पाईप लाईन मधून घेतले असल्यास) व र.रु.५,०००/- (अनाधिकृत नळ जोडण्या अयोग्य पाईप लाईन मधून घेतले असल्यास) याप्रमाणे दंडात्मक कारवाई करुन पाणी कनेक्शन अधिकृत करुन देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत नळजोडण्या वेळोवेळी टेक्नीकल विभागाकडून नियमित करुन घेण्यात आलेल्या आहेत.

तद्नंतरही महानगरपालिकेकडून अनाधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई होत असून देखील त्याचे गांर्भिय नागरिकांमध्ये दिसून येत नाही. अनाधिकृत नळ कनेक्शनवर आकारण्यात येणाऱ्या दंडाची रक्कम खुपच कमी असल्याने आजही बऱ्याच ठिकाणी अनाधिकृत नळ कनेक्शन सापडत असल्यामुळे नियमानुसार पैसे भरणाऱ्या ग्राहकांमध्ये संभ्रम निमार्ण झाला असल्याने, अनाधिकृत नळ कनेक्शन जोडून घेणेचे प्रमाणे कमी होणेच्या दृष्टीने अनाधिकृत नळ कनेक्शनवर जास्तीत जास्त शास्ती वाढविणे उचित होईल यासाठी अनाधिकृत नळ कनेक्शनच्या शास्ती मध्ये वाढ करुन, खालील प्रमाणे शास्ती आकारणी करणेस प्रस्तावित करणेत आले आहे.

अ.क्र.	घर / व्यवसाय	सुधारीत आकारण्यात येणारी शास्ती	आकारण्यात येणाऱ्या शास्तीचे बिल	विलंब शुल्क दर
१.	घरगुती वापराकरिता	रु. ७५००/-	कर आकारणी केलेपासून अथवा मागील ५ वर्षाच्या सरासरी दराने	एकूण आकारण्यात आलेल्या बिलावर मासिक १.५% प्रमाणे विलंब शुल्क
२.	अपार्टमेंकरिता	रु.७५००/- (अपार्टमेंट) (सोसायटी असेल तर एकूण अपा X शास्ती)	कर आकारणी केलेपासून अथवा मागील ५ वर्षाच्या प्रति सदनिका सरासरी दराप्रमाणे	एकूण आकारण्यात आलेल्या बिलावर मासिक १.५% प्रमाणे विलंब शुल्क
३.	वाणिज्य	रु.२०,०००/-	कर आकारणी केलेपासून अथवा मागील ५ वर्षाच्या सरासरी दराने	एकूण आकारण्यात आलेल्या बिलावर मासिक १.५% प्रमाणे विलंब शुल्क
४.	इंडस्ट्रिज	रु.१,००,०००/-	कर आकारणी केलेपासून अथवा मागील ५ वर्षाच्या सरासरी दराने	एकूण आकारण्यात आलेल्या बिलावर मासिक १.५% प्रमाणे विलंब शुल्क

उपरोक्त प्रस्तावति केल्याप्रमाणे अनाधिकृत नळ कनेक्शनसाठी दि.१६/०६/२०२४ पासून शास्ती आकारणी करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

कार्यकारी अभियंता (पा.पु.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०४ **दिनांक :-** १०/०६/२०२४

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग,सांगली) यांचे दि.०७/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना मागणी प्रमाणे पाणी पुरवठा सोईसाठी नविन नळ कनेक्शन देणेत येत असून, त्यासाठी आकारण्यात येणारे दर हे महासभा ठराव क्र.१२३ दि.२१/०१/२००९ प्रमाणे आकारण्यात येत आहेत. सदरचे दर खुपच कमी असून, अनामत रक्कमेमध्ये कोणतेही दर वाढ करणेत आलेली नाही. तसेच, सद्याचा होणारा अस्थापना खर्च व आकारण्यात येणारे दर यामध्ये तफावत असल्याने, नागरिकांना नविन नळ पाणी कनेक्शन देताना अनामत रक्कमेध्ये वाढ करणे आवश्यक आहे. यासाठी नविन नळ कनेक्शन जोडण्याच्या अनामत रक्कमेमध्ये सुधारीत दर आकारणी करणे योग्य होणार असून, पुर्वीच्या दरात अनामत व जोडणी शुल्कामध्ये खालील प्रमाणे वाढ करणेसाठी प्रस्तावित करणेत आले आहे.

अ.क्र.	कनेक्शनचा वापर	पाणी पट्टी डिपॉझिट		जोडणी शुल्क	
		पुर्वीचे	सुधारित	पुर्वीचे	सुधारित
१	२	३	४	५	६
१.	घरगुती	अ) रु.७००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत) ब) पुढील प्रत्येक चौ.फुट बांधकामास रु.१/-	अ) रु.१०००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत) ब) पुढील प्रत्येक चौ.फुट बांधकामास रु.१/-	रु.१००/-	रु.३००/-
२.	वाणिज्य	अ) रु.२०००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत) ब) पुढील प्रत्येक चौ.फुट बांधकामास रु.२/-	अ)रु.५०००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत) ब)पुढील प्रत्येक चौ.फुट बांधकामास रु.२/-	रु.१००/-	रु.३००/-
३.	ना नफा ना तोटा	अ)रु.१०००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत)	अ)रु.१५००/- (५०० स्केअर फुट बांधकाम पर्यंत) ब)पुढील प्रत्येक चौ.फुट बांधकामास रु.१/-	रु.१००/-	रु.३००/-

वरील प्रमाणे नविन नळ कनेक्शन जोडण्याच्या अनामत व जोडणी शुल्कामध्ये वाढ करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

कार्यकारी अधिकारी (पा.पु.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०५ **दिनांक :-** १०/०६/२०२४

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता व कर विभाग,सांगली) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करधारक कराची रक्कम भरण्यासाठी रोख, धनादेश मागणी धनाकर्ष (डी.डी.) आणि ऑनलाईन अशा प्रकारचे पर्याय उपलब्ध असून, धनादेशाद्वारे रक्कम भरताना धनादेश बँकेत त्याच दिवशी जमा होत नसल्याने तसेच काही कारणाने धनादेश वटला नाहीतर संबंधीतास दंड म्हणून र.रु.६०/- इतकी रक्कम भरुन घेतली जाते.

साधारणपणे एका आर्थिक वर्षामध्ये २०० ते २५० इतके धनादेश न वटल्याचे निदर्शनास आले असून, दंडाच्या रक्कमेत वाढ केलेस धनादेश न वटण्याचे प्रमाण कमी होईल यासाठी धनादेश न वटल्यास प्रत्येक धनादेशास र.रु.५००/- मात्र दंड करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

उपायुक्त (मालमत्ता व कर)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०६ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांसाठी मालमत्ता कर भरण्यासाठी सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षापासून ऑनलाईन पेमेंट ऑप्शन उपलब्ध करुन देण्यात येत असून, सदर मालमत्ता धारकाचा इमेल आय.डी. व मोबाईल नंबर प्राप्त होणार असलेने वेळोवेळी मालमत्ता करासंबंधीची अद्यावत माहिती देणे सोईस्कर होणार असल्याने, जे मालमत्ताधारक मालमत्ता कराचे देयक तसेच रक्कम भरल्यानंतर मिळणाऱ्या पावतीची हार्ड कॉपी घेण्याऐवजी गो ग्रीन सुविधे अंतर्गत ई-बील व ई-रिसाटसाठी नोंद करतील अशा मालमत्ता धारकांना देयकामध्ये सामान्य करात र.रु.१०/- इतकी सवलत देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(सुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता व इतर)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०७ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकूण मिळकत १,५४,००० इतक्या असून, सदर मिळकर्तीना कराची आकारणी इमारत प्रकार चटई क्षेत्र, वापर, मंजुर दरानुसार व झोन नुसार करणेत येत असून, इमारतीमधील पार्किंग क्षेत्राला आकारणी करणेत आलेली नाही. मंजूर दरपत्रकामध्ये पार्किंग क्षेत्राला कोणत्या दराने आकारणी करावी या बाबत दर निश्चित नसलेने आज अखेर पार्किंग क्षेत्राला कराची आकारणी करणेत आलेली नाही.

महापालिका क्षेत्रामध्ये बरेच अपार्टमेंट,बंगलो इमारती मिळकतीमध्ये पार्किंगची सोय असते त्यांना अद्याप कराची आकारणी केली गेलेली नाही. सदर पार्किंग क्षेत्राची कर आकारणी केलेस महापालिका उत्पन्नात भर पडणार असलेने, पार्किंग असलेल्या मिळकर्तीना पार्किंग क्षेत्राची कर आकारणी, ओपन प्लॉटचा दराने आकारणी करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अतिरिक्त (मालमत्ता कर)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०८ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०६/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.मनपा-२०२३ / प्र.क्र.८७-क (७७) / भाग-२/नवि-१६ दि.०६/०६/२०२४ अन्वये सन २०२३-२४ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर एकूण ०२ कामांचा र.रु.३५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मंजूर झाला असून, सदर कामाची कार्यान्वयन यंत्रणा महानगरपालिका असून, सदर शासन निर्णयानुसार शासन अनुदान १००% आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील खालील मंजूर एकूण ०२ कामांचा र.रु.३५,००,०००/- मात्रचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय,सांगली यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी सादर करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रु. (लक्ष)
१.	सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मध्ये चंद्रकांत पाटील घर ते सागर मगदुम घरापर्यत रस्ता काँक्रिटीकरण, लादीकरण व रस्ता सुधारणा करणे.	१५.००
२.	सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील प्राथमिक शाळा नं.२६ वाघमोडे नगर कुपवाड समोरील व्यायाम शाळा नुतनीकरण करणे व व्यायामाचे साहित्य खरेदी करणे.	२०.००
	एकुण र.रु.	**३५.००**

शहर अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ०९ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील मिरज येथीलसर्व्हे नं. १पै,२पै,५पै व ६पै ही जमिन मिरज मंजुर विकास योजनानकाशा नुसार ही जागा आ.क्र.४५९ "स्टेडियम" ने बाधित होते.

अ.क्रं.	तपशिल	मुद्यांचे स्पष्टीकरण	क्षेत्र
१.	क्रिडांगणाचे एकूण क्षेत्र	आरक्षण क्रं. ४८९ (स्टेडिअम) नुसार स.नं.१,२,५,६ चे क्षेत्र.	५.६० हे. ५६०००.०० चौ.मी.(१४ एकर)
२.	एकूण आरक्षणा खालील क्षेत्रापैकी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कलम १२७ नुसार आरक्षणाखालील जागा व्यपगत (lapse)	सर्व्हे नंबर ५ पैकी	५६५६.०० चौ.मी. (१.५ एकर)
३.	निव्वळ आरक्षणाखालील क्षेत्र	सर्व्हे नं.१ पैकी, ६ पैकी	५०,३४४.०० चौ.मी.
४.	महानगरपालिका ताब्यातील आरक्षणाचे क्षेत्र	१)ULC कडून स.नं. १/अ/२अ/१ चे मनपा कडे वर्ग झालेले क्षेत्र. २)ULC कडून स.नं. १/अ/३अ/१ चे मनपा कडे वर्ग झालेले क्षेत्र. ३) ULC कडून स.नं. १/अ/३ब/१ चे मनपा कडे वर्ग झालेले क्षेत्र. ४) महाराष्ट्र शासनाची स.नं. १अ/२ब मधील क्षेत्र. ५) खाजगी वाटाघाटीने श्री. कावले यांचेकडून सन २००२ चे खरेदी पत्राने मनपाने ताब्यात घेतलेले क्षेत्र. ६) स.नं. ६ पैकी मे.प्रणव बिल्डकॉन तर्फे श्री. किशोर पटवर्धन यांनी TDR घेवून मनपाच्या ताब्यात दिलेले क्षेत्र. ७)स.नं.५/१ पैकी कागवाडे यांच्याकडून खरेदी पत्र नुसार संपादीत होणारे क्षेत्र. ८) ले-आऊट नुसार स.नं. २ मधील मनपाच्या ताब्यातील जागा ९) श्री चड्डा व इतर यांनी दिलेले मनपाच्या ताब्यातील जागा	२०८३ चौ.मी. ५६७७.०७ चौ.मी. ५६७७.०७ चौ.मी ५९०० चौ.मी ३२०० चौ.मी. २६७५.०० चौ.मी. ४००० चौ.मी. ५८६ चौ.मी. ६४०७ चौ.मी.
		एकूण	३६२०५.१४चौ.मी.(९.०५एकर)
५.	एकूण ताब्यात आलेले क्षेत्र	सर्व्हे नंबर १ पैकी , ६ पैकी	३६,२०५.१४ चौ.मी(९.०५एकर)
६.	ताब्यात न आलेले क्षेत्र	सर्व्हे नंबर १ पैकी	१४,१३८.८६ चौ.मी. (३.५३एकर)

मिरज येथीलसर्व्हे नं १/अ/४ब/४अ/१ ही जागा श्री.झाकीरहुसेन हाजीसाहेब जमादार व इतर यांचे मालकीचे आहे. जागेचे ७/१२ उता-या नुसार क्षेत्र १.४५.०५ हे.आर म्हणजे १४,५०५.०० चौ.मी आहे. उक्त विषयांकीत जागेचे सदर ७/१२ उता-यावर सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्र ०.१२.५७ हे.आर म्हणजे १२५७.०० चौ.मी नावाची नोंद आढळुन येते. श्री. जमादार व इतर यांनी मनपा विरुध्द मिरज येथील दिवाणी न्यायालय येथे रे.दि.मु.न १३१/२०२३ अन्वयेभुसंपादन रक्कम मिळणेकामी दावा दाखल केले आहे. सदरचा दावा मनपा पॅनल वरिल ॲड श्री सुनिल नांद्रे कामकाज पाहत आहे.मिरज येथील सर्व्हे नंबर १ब/४ब/४/१ पैकी रेखांकनातील वहीवाट रस्ता क्षेत्र १२४७.०० चौ.मी यास सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नावे ७/१२ रेकॉर्डला नोंद आहे त्याबाबतचा फेरफार क्रमांक ५६७९७ झालेला आहे. सदर रस्ते महानगरपालिकेकडे विनामोबदला सादर झालेले आहेत,असे म्हणणे श्री नांद्रे यांना दिले आहे. सोबत चालू तारखेचा ७/१२ उतारा व फेरफार लगत केलेले आहे.

सबब उक्त विषयांकीत जागेवर मा.आयुक्तसो व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी दि:-१६/०५/२०२४ रोजी फिरती केले असता,जागेची संपुर्ण माहिती देणेत आले. श्री.झाकीरहुसेन हाजीसाहेब जमादार व इतर यांना जा.क्र. मनपा / नरमि /नर-७/४८ /२०२२-२३ दिनांक २२/०४/२०२२ अन्वये मनपा सदरचे आरक्षण विकसीत करु इच्छिते, आरक्षणाखालील जागा टि.डी.आर द्वारे महानगरपालिकेच्या ताब्यात देणेकामी कळविणेत आले होत पण संबंधिताकडून कोणतीही माहिती व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झालेली नाहीत. यापुर्वी मा.जिल्हाधिकारीसो, सांगली यांचेकडे श्री.चड्डा व श्री. जमादार यांचा भुसंपादन प्रस्ताव रक्कम रुपये १,९१,९२,३२०/- + २,३३,८३,४६४/- मात्र रकमेस तत्कालीन आयुक्तसो यांनी मान्यता दिलेली होती.पण महासभा ठराव क्रमांक ४६९ दिनांक २०/०४/२०२३ अन्वये श्री.चड्डा यांच्या प्रस्तावास खाजगी वाटाघाटीने संपादीत करणेस मान्यता दिलेने, श्री.चड्डा यांची जागा खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेणेत आली त्याची कार्यालयीन टिप्पणी सोबत लगत केलेली आहे.

मिरज येथील सर्व्हे नंबर १/अ/४ब/४अ/१ ही जागा अद्यापर्यंत ताब्यात न आलेने मा.आयुक्तसो यांनी सदरची जागा अनिवार्य भुसंपादन (कंम्पलसरी ॲक्वेजेशन) करणेकामी आदेशित केले नुसारमिरज स.नं १/अ/४ब/४अ/१ ही जागा संपादन करावयाचे झालेस , मोजणी नकाशावरील क्षेत्रानुसार मुल्यांकन खालील प्रमाणे सादर करणेत आले आहे.

मिरज स.नं.१/अ/४ब/४अ/१ खुली जमिनीचा सन २०२४ चे शिघ्र दर गणकानुसार दर -५१२०/-चौ.मी आहे. सदर जागेमध्ये " स्टेडियम " आरक्षण क्षेत्र ७/१२ उताऱ्यानुसार=१४,५०५.०० चौ.मी इतके आहे.मोजणी नकाशानुसार क्षेत्र १२८८० चौ.मी. मात्र आहे.

१२,८८० X५१२०X८०%= ५,२७,५६,४८०/-(पाच कोटी सत्तावीत लाख छंप्पन हजार चारशे ऐंशी मात्र)

वरील प्रमाणे विषयपत्रातील शिफारशीनुसार मुल्यांकनाला ही सभा मान्यता देत आहे.

All pages signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सहा. संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १० **दिनांक :१०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

घाटकोपर, मुंबई येथे घडलेल्या होर्डिंग्ज् दुर्घटनेच्या अनुषंगाने करावयाच्या कारवाईबाबत नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१४/०५/२०२४ रोजीचे शासन आदेश क्रमांक संकिर्ण - २०२४/प्र.क्र.२१२ नवी-२२ नुसार सूचना निर्गमित केल्या आहेत.

शासन अधिसूचना क्र.पीएमसी-३०१०/प्र.क्र.३९४/१०/नवी-२२ दि.०९/०५/२०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्राकरीता आकाश चिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण नियमावलीमध्ये जाहिरात फलकांचे आकारमान,उंची व इतर तरतुदी विहित करण्यात आलेल्या असून सदर जाहिरात नियमावलीच्या तरतुदींच्या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात फलकांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करणे व रचना कमकुवत असतील तर निष्कासीत करणे इत्यादी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश शासन आदेशाद्वारे देण्यात आलेले आहेत. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जाहिरात फलकांचे सर्व्हेक्षण करणेत आले असून महापालिका क्षेत्रात सध्या खाजगी जागेवरील २४० व म.न.पा. जागेवरील ७२ असे एकूण ३१२ अधिकृत जाहिरात फलक आहेत. तसेच खाजगी जागेतील अनाधिकृत सुमारे २९ जाहिरात फलक निर्दशनास आले असून नविन जाहिरात फलक परवानगीसाठी सुमारे ३८ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सर्व अधिकृत जाहिरात फलकांना संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) साठी नोटीसा देण्यात आलेल्या होत्या व खाजगी जागेतील अनाधिकृत सर्व जाहिरात फलकांना निष्कासीत करणेचे काम पुर्ण झाले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन खालील प्रमाणे प्रशासकीय ठराव अंतिम करणेत येत आहे ; -

जाहिरात फलक नुतनीकरण व इतर शुल्क हे सन २०१९ मधील मंजुर असल्याने सदर शुल्कामध्ये दरसुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक फलकासाठी खालील प्रमाणे सुधारीत दर लागू करणेत येत आहेत –

अ) नुतन जाहिरात फलक परवाना शुल्क – र.रु.७५,०००/-
ब) जाहिरात फलक परवाना नुतनीकरण शुल्क – र.रु.२०,०००/-
क) फार्म फी - र.रु.५००/-
ड) अनाधिकृत होर्डिंग उभारणी केली असल्यास दंड - र.रु.७५,०००/-
ई) महानगरपालिकेमार्फत निष्कासन केल्यास आकारावयाचे शुल्क – र.रु.२५,०००/-
फ) अधिकृत व अस्तित्वातील जाहिरात फलक स्थलांतरित करावयाचा असल्यास स्थलांतर शुल्क – र.रु.१०,०००/-

... २ ...

तसेच शहर विद्रुपीकरण टाळणेच्या हेतू छोटे फ्लेक्स, बॅनर इत्यादी वरील व्यावसायिक जाहिराती टप्प्याटप्याने कमी व अंतिमत: बंद करणेच्या दृष्टीने महानगरपालिका लवकरात लवकर धोरण निश्चित करेल.

१. या ठरावापासून पुढे पहिल्या तीन वर्षाकरीता प्रति होर्डिंग र.रु.२०,०००/- प्रमाणे परवाना शुल्क राहील. तसेच तीन वर्षानंतर १०% प्रमाणे उपरोक्त सर्व शुल्कांमध्ये दरवाढ करणेत येईल. ती दरवाढ पुढील तीन वर्षासाठी लागू राहील, अशाप्रकारे प्रति तीन वर्षानी दरवाढ करण्यात येईल.

२. प्रत्येक जाहिरात फलक धारकाने परवाना कालावधी संपण्याच्या किमान एक महिन्यापुर्वी परवाना नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील. परवाना कालावधी संपल्यानंतर महत्तम १५ दिवसांचा कालावधी जाहिरात फलक धारकाला देण्यात येईल. या कालावधीत परवाना नुतनीकरण केल्यास प्रतिदिन रु.५००/- इतका दंड लागू राहील. १५ दिवसांनंतरही परवाना नुतनीकरण न केल्यास परवाना रद्द करणेत येईल व निष्कासन करुन त्याचे शुल्क जाहिरात फलक धारकांकडून वसुल करणेत येईल.

३. जाहिरात परवाना / नुतनीकरण शुल्क जमा केलेनंतर प्रत्येक होर्डिंगचे रितसर परवाना पत्र महानगरपालिकेतर्फे जाहिरात फलक धारकांना देण्यात येईल.

४. महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनधिकृतरित्या उभारण्यात येणाऱ्या, शहर विद्रुपीकरणास कारणीभूत ठरणाऱ्या व धोकादायक होर्डिंग्जचा आळा घालणेच्या दृष्टीचे चुतव जाहिरात फलक परवाना देणेकामी खालील प्रमाणे समिती निर्णय घेईल ; -

अ) मा.आयुक्त - अध्यक्ष
ब) उपायुक्त (मालमत्ता व्यवस्थापन) - सदस्य
क) शहर अभियंता - सदस्य
ख) सहा.संचालक नगररचना - सदस्य
ग) मालमत्ता अधिक्षक - सदस्य सचिव
घ) म.न.पा. ने मान्यता दिलेल्या जाहीरात फलकधारक संघटना/असोसिएशन चे कार्यरत अध्यक्ष – सदस्य
ङ) म.न.पा. ने मान्यता दिलेल्या जाहीरात फलकधारक संघटना/असोसिएशन चे कार्यरत सचिव – सदस्य

५. जाहिरात फलकधारकाने जाहिरात फलकाची सुरक्षा, स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी यासोबतच शहराचे सौंदर्य अबाधित ठेवून सुयोग्य सुशोभिकरण करण्याची तजवीज करणे आवश्यक राहील.त्याबाबत म.न.पा. ने वेळोवेळी दिलेल्या लेखी सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर जाहिरात फलका संदर्भात शासन अधिसूचनेचे काटेकोर पालन करणेचे असून शर्ती-अटींचा भंग झाल्यास धारकावर उचित कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन परवाना रद्द करणेत येईल.

सदर प्रशासकीय ठरावाद्वारे यापुर्वी मोठे जाहिरात फलक /होर्डिंग संबंधी महापालिकेने घेतलेले सर्व निर्णय, आदेश व ठराव अधिक्रमित करण्यात येत आहेत.

वरीलप्रमाणे सूचनांचे अंमलबजावणी करणेस ही सभा आदेशित करुन, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

All pages signed,

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ११ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगलीवाडी येथील जोतीबा मंदिर परिसरामध्ये सांडपाणी निचऱ्याची कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे महानगरपालिकेने अंदाजे २ कोटी इतका निधी खर्च करून नवीन पाईपलाईन टाकलेली आहे. सदरच्या ड्रेनेज लाईनला लेव्हल सापडत नसल्याने सदरची ड्रेनेज लाईन कार्यान्वीत झालेली नाही. त्यामुळे सदर परिसरामधील ड्रेनेज पंप स्टेशन उभारणे गरजेचे आहे. याकरीता महानगरपालिकेने दि.१२.०५.२०२२ रोजी वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन किमान १० गुंठे जागा खाजगी मिळकतधारकांनी पंपीग स्टेशनसाठी आर्थिक / एफएसआय/टीडीआर च्या मोबदल्यात द्यावी असे अवाहन केले होते. त्यास अनुसरून सांगलीवाडी येथील स.नं. ४२ मधील श्री. धोंडीराम भिमराव पाटील व रंगराव भिमराव पाटील यांनी दि. २३.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये १० गुंठे जागा देणेची तयारी दर्शविलेली आहे.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील सांगलीवाडी स.नं. ४२/१ /अ/१ चे उताऱ्यानुसार ० हे. ८८ आर म्हणजेच एकूण ८८००.०० चौ.मी. क्षेत्रापैकी १०००.०० चौ.मी. क्षेत्राचे, महासभा क्र. २, ठराव क्र. २४०, विषय क्र. ०१ (ज), दि. २०.०६.२०२२ रोजी महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र. १३ मधील सांगलीवाडी स.नं. ४२/१ /अ/१ या खाजगी जमिनीमध्ये ड्रेनेज पंपीग स्टेशन बांधणेकरीता ठराव मंजूर आहे. सदरचे क्षेत्र हे श्री. धोंडीराम भिमराव पाटील यांचे ४४००.०० चौ.मी. तसेच श्री.रंगराव भिमराव पाटील यांचे ४४००.०० चौ.मी. समाईक वहिवाटीमध्ये असून, त्यांचे नांवे ७/१२ उताऱ्यावर दिसून येतात.

सदर मिळकतधारकांनी आमचे समाईक मालकीच्या क्षेत्रापैकी पश्चिम व दक्षिण कोपऱ्यातील म्हणजेच नैऋत्य कोपऱ्यातील ०.१० आर म्हणजेच १०००.०० चौ.मी. इतके क्षेत्र नियोजीत दक्षिण उत्तर चालीच्या ३०.४८ मी. डी. पी. रस्त्याच्या पश्चिमेकडील क्षेत्रड्रेनेज पंपीग स्टेशन या सार्वजनिक वापरासाठी महानगरपालिकेस देणेस तयार असून त्यांनी सदर जागेचे भूसंपादन करणेबाबत दि.२९.०३.२०२३ रोजी रूपये १००/- चे मुद्रांकावर संमत्तीपत्र देऊन संमत्ती दर्शविलेली आहे. या संमत्तीपत्राद्वारे सदरची जमीन खाजगी वाटाघाटीने संपूर्ण रक्कमेच्या मोबदल्यात महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेची संमत्ती दिलेली आहे.

मंजूर विकास योजनेच्या कलम ३१ (१) अधिसूचना अहवालानुसार विषयांकीत जमीन ही गांवठाण हद्दीच्या बाहेर विस्तारीत क्षेत्रातील असून, प्रस्तावित जागेच्या पुर्वेस दक्षिणोत्तर चालीने नियोजीत ३०.४८ मी. डी. पी. रस्त्याने बाधित होते. तर दक्षिणेस १५.२५ मी. डी. पी. रस्त्याने बाधित होते. तसेच मिळकतीच्या पुर्वेकडील बाजूस दक्षिणोत्तर चालीने १५.२५ मी. डी. पी. रस्त्याने बाधित होते. स.नं. ४२/१ चा काही भाग हा आ.क्र. १७, भाजी मार्केट व जनता बझारने (VM & JB) क्षेत्र- ४०००.०० चौ.मी. बाधित होते. तर आ.क्र. १८, सार्वजनिक शौचलय (PT) क्षेत्र- ३००.०० चौ.मी. व आ.क्र. १९ पार्किंग(P) क्षेत्र- ५००.०० चौ.मी. समाविष्ठ आहे. उर्वरीत भाग रहिवास विभागात समाविष्ठ आहे. मा. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग सांगली यांचेकडील पूररेषा अभिप्रायानुसार सदरची जमीन ही पूर्णत: ब्ल्यूलाईन व रेडलाईनच्या बाहेर आहे. सदर मिळकतीस आस्तित्वातील १५.२५ मी. डी. पी. रस्त्याचा पोहोच रस्ता उपलब्ध होत आहे. मिळकतधारकांनी देऊ केलेली जमीन ही रहिवास विभागातील असलेने त्या ठिकाणी ड्रनेज पंपीग स्टेशनचे बांधकाम अनुज्ञेय होत आहे.

केंद्र शासनाच्या भूमी संपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा अधिनियम, २०१३ (The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition Rehabilitation and Resttlement Act २०१३) हा नवीन कायदा दि.०१.०१.२०१४ पासून अंमलात आला आहे. भूसंपादन प्रकरणामध्ये मुल्यांकन करताना जमीन मालकांना दिलासा रक्कम यापूर्वीच्या कायद्यानुसार ३०% प्रमाणे देण्यात येत होती. आता नवीन कायद्यानुसार ती १००% करण्यात आली आहे.

... २ ...

तथापि ड्रेनेज पंपीग स्टेशनसाठी नेमक्या किती क्षेत्राची आवश्यकता आहे. याबाबत जल:निस्सारण विभागाकडे पत्र क्र. १०८३, दि. २६.१०.२०२३ ने माहिती मागितली असता, पत्र क्र. २८५, दि. १३.१२.२०२३ ने ४००.०० चौ.मी. क्षेत्राचे भूसंपादन ड्रेनेज पंपीग स्टेशनसाठी आवश्यक असलेचे कळविले आहे.

सदरील नुकसान भरपाई देणे शक्य असलेल्या निव्वळ आरक्षणा खालील एकत्रित क्षेत्र ४८००.०० चौ.मी. इतके असून, जागेची चालू शासकीय मुल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यानुसार विभाग क्र.१०/६९ सांगलीवाडी अंतर्गत नाविकास विभाग- खुली जमीन रूपये १,२२०/- प्रती चौ.मी. दर आहे. जमिनीची किंमत मुल्य अंदाजे-

१) १ ते ५०० चौ.मी. पर्यंत १००% म्हणजेच दर- ५०० x १२२०/- = ६,१०,०००/-
२) ५०१ ते २००० चौ.मी. पर्यंत ८०% दर- १५०० x १२२०/-x ८०% = १४,६४,०००/-
३) २००१ ते ४००० चौ.मी. पर्यंत ६०% दर- २००० x १२२०/-x ६०% = १४,६४,०००/-
४) ४००१ ते ४८०० चौ.मी. पर्यंत ४०% दर- २००० x १२२०/-x ४०% = ३,९०,४००/-

अ.क्र.	तपशिल	रक्कम रूपये
१	जमिनीची किंमत	३९,२८,४००/-
२	१००% दिलासा रक्कम	३९,२८,४००/-
३	एकूण रक्कम	७८,५६,८००/-
४	दोन वर्षासाठी प्रतिवर्ष १२% अतिरिक्त घटक	१८,८५,६३२/-
एकूण		९७,४२,४३२/-

सदर भूसंपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेचा झालेस, वरील रक्कमेच्या २/३ रक्कम भूसंपादन प्रस्तावासोबत मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे भरणे आवश्यक आहे. सदरची २/३ रक्कम ही ६४,९४,९५५/- इतकी होते. तथापि सदर परिसरामध्ये टाकणेत आलेली ड्रेनेज लाईन कार्यान्वीत होणेसाठी उभारणी अंत्यत गरजेची असलेने सदर खाजगी जागा तातडीने भूसंपादन करून घेणे आवश्यक आहे.

तथापि मुळ जमीनमालक यांचेशी मा. आयुक्तसो यांनी दि. ०६.०६.२०२४ रोजी केलेल्या चर्चेनुसार, सांगलीवाडी येथील स.नं. ४२/१अ/१ या आमच्या स्वमालकीच्या जमिनीमध्ये ड्रेनेज पंपहाऊस (पंप स्टेशन) उभे करणेकरीता जागा खरेदी करणेबाबत महानगरपालिका महासभेने मा. महासभा क्र.२, ठराव क्र.२४०, दि.२०.०६.२०२२ ने ठराव केलेला आहे. त्या अनुषंगाने आमच्या जमिनीत मंजूर विकास योजनेनुसार आ.क्र.१८, सार्व.शौचालय-३०० चौ.मी.,आ.क्र.१९,पार्किंग- ५००.०० चौ.मी.,आ.क्र.१७,भाजी मार्केट व जनता बझार- ४०००.०० चौ.मी. व ३०.०० मी. दक्षिणउत्तर चालीचा डी.पी. रस्त्याचे आरक्षणाने बाधित होत आहेत. सदरची आरक्षणे ही आमच्या रहात्या जागेवर असलेने विकसीत होऊ शकत नाहीत. तसेच आम्हांसही कागदोपत्री तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सदरची आरक्षणे ही आमच्याच जमिनीच्या पश्चिमेकडील हद्दीलगत स्थलांतर केल्यास वरील आरक्षणाचे क्षेत्र व डी. पी. रस्ता आम्ही महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेस तयार आहोत. सदरच्या जमिनीवरील विकास योजनेतील तिन्हीही आरक्षणाखालील क्षेत्र, तसेच नियोजीत ३०.४८ मी. डी.पी. रस्ता रूंदी खालील क्षेत्राचे होणाऱ्या एकूण नुकसान भरपाई रक्कमेपैकी महत्तम रक्कम रूपये ४० लक्ष रोखीने व उर्वरीत मोबदला हा टीडीआर स्वरूपात स्विकारणेची तयारी मुळ जमीनमालक यांनी संमत्ती दर्शविलेली आहे.

सबब सांगलीवाडी स.नं.४२/१/अ/१ मधील ४८००.०० चौ.मी. आरक्षणाखालील क्षेत्र व ३०.४८ मी.डी.पी. रस्त्याखालील क्षेत्र, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व नियोजन प्राधिकरण १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेस व संपादित जागेचे खरेदीदस्त होणेच्या अनुषंगीक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सह. संचालक (नं.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १२ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- १२

सोबतचे अतिरिक्त आयुक्त,मिरज (विद्युत विभाग) यांचे दि.०७/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या स्थलसिमेमध्ये जुने पारंपारिक दिवे बदलून त्याठिकाणी नविन स्मार्ट एल.ई.डी.पथदिवे पुरविणे व बसविणे व १५ वर्ष त्याची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.समुद्रा इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम प्रा.लि.पुणे या कंपनीस दि.१०/१२/२०२१ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेले असून, सदर कंपनी सोबत दि.१०/१२/२०२१ रोजीचे करारपत्र अंतीम करणेत आलेले आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.१७५ दि.१७/०२/२०२१ अन्वये तसेच करारपत्रातील शर्ती-अटीनुसार महानगरपालिकेत सद्या कार्यरत असलेले मानधन कर्मचारी पैकी २० कर्मचारी मक्तेदाराने घेणेबाबत दि.२२/१२/२०२१ रोजीच्या पत्राने आदेशित करणेत आले होते. सदर कंपनीने प्रकल्प पुर्ण झालेवर सदर कर्मचारी वर्ग करुन घेतो असे दि.२५/१२/२०२१ रोजीच्या पत्राने कळविलेनुसार तसेच मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे समवेत झाले दि.२१/०५/२०२४ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये महानगरपालिकेत सद्या कार्यरत असलेले मानधन कर्मचारी पैकी २० कर्मचारी दि.०१/०६/२०२४ रोजी कंपनीकडे वर्ग करुन घेणेबाबत आदेशित केले आहे. सदर कंपनीकडे वर्ग करावयाच्या कर्मचाऱ्यांचा तपशिल खालील प्रमाणे....

अ.क्र.	मानधन कर्मचारी नाव	मुळ नेमणुकीचा विभाग	पदनाम
१.	अविनाश शिवाजी पवार	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
२.	सचिन बाळासो चव्हाण	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
३.	अभिजीत तानाजी पवार	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
४.	गोपाळ अशोक तांबडे	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
५.	सनी अरुण पाटील	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
६.	रुस्तम शौकत नदाफ	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
७.	धनंजय अशोक जाधव	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
८.	प्रशांत प्रकाश ढोबळे	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
९.	इराण्णा इराप्पा मोरे	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन
१०.	अजित बाळू माने	स्ट्रीट लाईट विभाग,सांगली	वायरमन

... २ ...

११.	इब्राहिम जहांगीर सनदी	स्ट्रीट लाईट विभाग,कुपवाड	वायरमन
१२.	जितेंद्र लक्ष्मण जाधव	स्ट्रीट लाईट विभाग,कुपवाड	वायरमन
१३.	सचिन बाळासाहेब काटकर	स्ट्रीट लाईट विभाग,कुपवाड	वायरमन
१४.	राजेंद्र विश्वनाथ मास्ते	स्ट्रीट लाईट विभाग,कुपवाड	वायरमन
१५.	अजित बाबू माळी	स्ट्रीट लाईट विभाग,कुपवाड	वायरमन
१६.	योगिराज संभाजी पाटील	स्ट्रीट लाईट विभाग,मिरज	वायरमन
१७.	आप्पासाहेब बाळासाहेब पवार	स्ट्रीट लाईट विभाग,मिरज	वायरमन
१८.	रियाज नूरमहंमद खतिब	स्ट्रीट लाईट विभाग,मिरज	वायरमन
१९.	गुरुप्रसाद अशोक कदम	स्ट्रीट लाईट विभाग,मिरज	वायरमन
२०.	सुरेश नाना दळवी	स्ट्रीट लाईट विभाग,मिरज	वायरमन

वरील प्रमाणे महानगरपालिकेच्या मानधन तत्वावरील कार्यरत २० कर्मचाऱ्यांचे शासन नियमानुसार प्रत्येक महिन्यास किमान वेतन (मुळ वेतन,महागाई भत्ता,ई.पी.एफ.,इन्शुरन्स इ.) मक्तेदाराने महापालिकेकडे दरमहा जमा करणे व महापालिकेमार्फत वेतन / मानधन कर्मचाऱ्यांना आदा करणे तसेच महापालिका क्षेत्रामध्ये महापुर,नैसर्गिक आपत्ती व इतर सर्व समाजाच्या सणासुदीच्या कालावधीमध्ये महापालिकेने सदर कर्मचारी मागणी केलेस महापालिकेकडे विनाशर्थ देणे तसेच, करारपत्रातील अटीस अधिन राहून वरील २० मानधन कर्मचारी मे.समुद्रा इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम प्रा.लि,पुणे या कंपनीकडे वर्ग करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. All page signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (विद्युत)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १३ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०३/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली विभागाकडील दैनंदिन परवाना फी वसुल ठेका निश्चित करणेकरिता तत्कालीन मा.आयुक्तसो, यांचे मान्यतेने व आदेशानुसार मनपाचा आर्थिक फायदा विचारात घेऊन प्रथमच सन २०१७-१८ करिता सदरच्या कामगिरीचा प्रस्ताव ई-टेंडरव्दारे निविदा मागवून करणेबाबत कार्यवाही करणेत आली होती. सदरची निविदा मागविताना पूर्वीच्या २०११ सालाच्या सर्व्हे अनुसरुन ५ X ४ जागेस असलेल्या दराचा विचार करुन रु. १०/- एवढा दर अंदाजित प्राप्त होईल. तसेच सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती प्रशासनाच्या दि. ०३/०१/२०१८ रोजीच्या विषयपत्रानुसार सभा क्रं. ९ विषय क्रं.४ ठराव क्रं. २३१/ दि. १७/०१/२०१८ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर दरामध्ये रु. ८/- महानगरपालिकेची फी रुपये २/- संबंधीत कामगिरीसाठी मक्तेदारास दयावा लागणार महेनताना असे एकूण १०/- अशी मान्यता दिलेली होती. त्यास अनुसरुन टेंडर मागविण्यात आलेले होते, सांगली उपविभागासाठी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली होती. अल्प प्रतिसाद मिळालेला होता.

तद्नंतर मा. महासभा ठराव क्रं. १४३/ दि. २८/०९/२०२० अन्वये तसेच मा. आयुक्तसो, यांचे दि. २०/१०/२०२० रोजीच्या आदेशानुसार दैनंदिन परवाना फी बाबत ई-लिलाव प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यास प्रभाग समिती निहाय फक्त प्रभाग समिती क्रं. ३ सोडता प्रतिसाद आलेला नाही. लेखी अर्ज देऊन माघार घेतलेली होती. त्यामुळे सदर ई-लिलाव प्रक्रिया रद्द करणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. तसेच मा. महासभा ठराव क्रं.१४३/ दि. २८/०९/२०२० अन्वये दरम्यानच्या काळात मालमत्ता विभागाकडून दैनंदिन परवाना फी आठवडा बाजार सह दैनिक बाजारात करण्यात येत आहे. त्यास सरासरी रक्कम रु.६१४०/- इतका अल्प प्रतिसाद मिळत होता. उलट फेरीवाला धोरणा अंतर्गत मासिक प्रति व्यवसायीक रु.३००/- प्रमाणे डिसे. २०२० अंतर्गत चांगला प्रतिसाद येत असल्याचे निदर्शनास आलेले होते. दैनंदिन परवाना फी म्हणून फेरीवाला धोरणा अंतर्गत ३००/- प्रमाणे प्रति व्यवसायीक मासिक फी व्यवसायीक यांनी स्वत: मनपाकडे भरणा केल्यास दैनंदिन परवाना फी वुसलीसाठी वेगळी यंत्रणा कार्यरत करण्याची आवश्यकता नाही, त्यांच्यावर उपविधीनुसार कारवाई करणे आवश्यक आहे.

व्यवसायकी यांची नोंद झाली असल्याने संख्या निश्चितीसह उत्पन्न देखील निश्चित होणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३०,३३२ व ३७६ नुसार कोणत्याही व्यवसायीकासाठी ३७६ अन्वये परवाना असणे बंधनकारक असल्याने फेरीवाला धोरण व अधिनियमानुसार जे व्यवसायीक सदरची रक्कम भरणार नाही. सदरचा प्रस्तावाकामी मुख्य लेखापरिक्षक यांच्या याकामी अभिप्राय घेऊन अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती यांच्याकडे मासिक ३००/- प्रमाणे मनपा क्षेत्रातील व (ब) मान्यतेसाठी सादर करणेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३३२ (अ) उपविधी, विनियम आणि स्थायी आदेश अंतर्गत मा. महा.शासन यांच्याकडे ४५५,४५६ नुसार महा. महानगरपालिका अधिनियम कलम ४५७(१४) नुसार व ४५८ (२०) (२८), ४६७,४६८, नुसार उपविधी सहा. स्थायी आदेश प्रारुप मसुदा मान्यतेसाठी प्रस्ताव तत्कालीन मा. आयुक्तसो यांचेकडे सादर करण्यात आलेला होता. त्यावर तत्कलीन मा. आयुक्तसो, यांनी खालील प्रमाणे आदेश दिलेले होते.

१. सर्व विक्रेते / व्यवसायीक फेरीवाला धोरणांतर्गत नोंदणीकृत होतील याबाबत उपाययोजना कराव्यात.
२. नोंदणीकृत विक्रेते/ व्यवसायीक फेरीवाला धोरणानुसार फेरीवाला समितीने निश्चित केलेले शुल्क भरतील याबाबत उपाययोजना कराव्यात.
३. १ व २ पूर्ण होईपर्यंत मनपाचे आर्थिक नुकसान होऊ नये,यासाठी मनपा कर्मचाऱ्यांमार्फत नोंदणीकृत नसलेल्यांची वसुली सुरु ठेवावी. असे आदेश दिलेले होते. त्यानुसार दैनंदिन परवाना फी बाबतची प्रक्रिया ही राष्ट्रीय फेरीवाला अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान सां.मि.कु. महानगरपालिका यांचेमार्फत कार्यवाही सुरु होती व आहे.

इकडील जा.क्र.मनपा/मालवि/१००/२०२४-२५ दि. २८/०५/२०२४ रोजी राष्ट्रीय फेरीवाला अंतर्गत राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान, सां.मि.कु. महानगरपालिका यांना कळविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन महानगरपालिका हद्दीमधील एकूण संख्या ३८३९ अशी दिलेली असून, ती खालील प्रमाणे

अ.क्र.	विभाग	बाजार व्यापाऱ्यांची संख्या
१	सांगली प्रभाग समिती क्रं.१	९३०
२	सांगली प्रभाग समिती क्रं.२	७२३
३	कुपवाड प्रभाग समिती क्रं.३	९७१
	मिरज प्रभाग समिती क्रं.४	१२१५
	एकूण	**३८३९**

वरील प्रमाणे एकूण ३८३९ इतकी व्यापाऱ्यांची संख्या प्राप्त झालेली आहे. त्यानुसार विक्रेत्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणानुसार दैनिक परवाना शुल्क वसूलीसाठी दैनिक शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे.

अ.क्र.	विक्रेत्यांचा प्रकार	शुल्क
१	बैठे व्यापारी	१०/-
२	हातगाडे (लाकडी)	१०/-
३	हातगाडे (स्टील)	१५/-
४	छोटा हत्ती, टेम्पो वरील विक्रेते	२०/-
५	स्टॉल (छोटे तंबू)	२०/-
६	आठवडी बाजार	वरील ५ प्रकारच्या विक्रेत्यांना त्यांचे दैनंदीन शुल्काचे दुप्पट

आठवडा बाजारची यादी खालीलप्रमाणे...

अ.क्र.	प्रभाग समिती क्रमांक	वार	वार्ड क्रमांक	ठिकाण
१	प्रभाग समिती क्रमांक १	मंगळवार	१३	सांगलीवाडी
२		बुधवार	११	संजय नगर
३		शुक्रवार	१२	पंचशिल नगर
४		शनिवार	१४	पेठ भाग
५		रविवार	१६	हिंदू-मुस्लिम चौक, खणभाग
अ.क्र.	**प्रभाग समिती क्रमांक**	**वार**	**वार्ड क्रमांक**	**ठिकाण**
१	प्रभाग समिती क्र. २	सोमवार	१०	१०० फुटी रोड, वडर कॉलनी
२			१८	शामराव नगर स्वराज्य चौक
३		बुधबार	१५	गणेश नगर, स्विमींग टँक जवळ
४		गुरूवार	१७	चांदणी चौक
५		शनिवार	१९	८० फुटी रोड, विश्रामबाग
६		रविवार	१९	१०० फुटी रोड, गणपती मंदीर चौक
अ.क्र.	**प्रभाग समिती क्रमांक**	**वार**	**वार्ड क्रमांक**	**ठिकाण**
१	प्रभाग समिती क्र. ३	सोमवार	१	भारत सुतगिरणी चौक
२		मंगळवार	१	अहिल्यानगर, कुपवाड
३			१	उल्हास नगर, कुपवाड
४			२	सोसायटी चौक, कुपवाड
५			९	गांधी कॉलनी, कुपवाड
६		बुधवार	८	विजय नगर चौक, कुपवाड
७			९	संजय नगर रोड, कुपवाड
८		गुरूवार	२	कुपवाड गावठाण दर्ग्यासमोर
९				माजी सैनिक वसाहत, मिरज
१०		शुक्रवार	१	संभाजी चौक, कापसे प्लॉट, कुपवाड
११			२	सैनिक नगर, कुपवाड
१२			८	वारणाली रोड, कुपवाड
१३			९	लक्ष्मी मंदिर चौक, कुपवाड
१४		रविवार	१	मराठा ग्रुप चौक, यशवंत नगर, कुपवाड
१५			२	चाणक्य चौक, कुपवाड

अ.क्र.	प्रभाग समिती क्रमांक	वार	वार्ड क्रमांक	ठिकाण
१	प्रभाग समिती क्रमांक ४	मंगळवार	३	छत्रपती शिवाजी महाराज चौक, मंगळवार पेठ, मिरज
२		बुधवार	५	गाडवे चौक, मिरज
३		शुक्रवार	३	कर्मवीर भाऊराव चौक, मिरज
४		शनिवार	२०	शास्त्री चौक, मिरज
५		रविवार	६	गुरूवार पेठ, मिरज
६			७	समता नगर, मिरज

साधारणपणे ५ X ४ मापाच्या जागेस भाजीपाला, फळ विक्रेते याच्याकडून प्रतिदिनी र.रु. १०/- तर कपडे अन्य व्यवसायीक यांच्याकडून प्रतिदिनी र.रु. १५/- प्रमाणे त्यापेक्षा जास्त जागेस वरील दराच्या दुप्पट, तिप्पट दर आकारणी करण्याची आहे. त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे

अ.क्र	विभाग	वार	वॉर्ड क्र.	व्यापाऱ्यांची संख्या	बैठे व्यापार करणारे भाजीवाले, फळवाले यांची संख्या ६०%	बैठे व्यापार करणारे भाजीवाले, फळवाले र.रु.१०/- प्रमाणे	कापड विक्रेते व इतर यांची संख्या ४०%	कापड विक्रेते व इतर यांची र.रु.१५/- प्रमाणे	एकूण प्रतिदिनी	३६५ दिवसा करिता होणारी एकूण रक्कम	एकूण रक्कमेच्या ८०% प्रमाणे होणारी रक्कम
						सांगली विभाग					
१	सांगली प्रभाग समिती क्र.१	मंगळवार	१३	९३०	५५८	५५८०	३७२	५५८०	१११६०	४०७३४००	३२५८७२०
		बुधवार	११								
		शुक्रवार	१२								
		शनिवार	१४								
		रविवार	१६								
२	सांगली प्रभाग समिती क्र.२	सोमवार	१०	७२३	४३३.८	४३३८	२८९.२	४३३८	८६७६	३१६६७४०	२५३३३९२
			१८								
		बुधवार	१५								
		गुरुवार	१७								
		शनिवार	१९								
		रविवार	१९								
३	कुपवाड प्रभाग समिती क्र.३	सोमवार	१	९७१	५८२.६	५८२६	३८८.४	५८२६	११६५२	४२५२९८०	३४०२३८४
		मंगळवार	१								
			१								
			२								
			९								
		बुधवार	८								
			९								
		गुरुवार	२								
		शुक्रवार	१								
			२								
			८								
			९								
		रविवार	१								
			२								
	एकूण			२६२४		१५७४४		१५७४४	३१४८८	११४९३१२०	९१९४४९६
						मिरज विभाग					
१	मिरज प्रभाग समिती क्र.४	मंगळवार	३	१२१५	७२९	७२९०	४८६	७२९०	१४५८०	५३२१७००	४२५७३६०
		बुधवार	५								
		शुक्रवार	३								
		शनिवार	२०								
			६								
		रविवार	७								
	एकूण		४१	१२१५		७२९०		७२९०	१४५८०	५३२१७००	४२५७३६०
	एकूण		४१	३८३९		२३०३४		२३०३४	४६०६८	१६८१४८२०	१३४५१८५६

किमान व्यवसाय संख्या निश्चित नुसार भाजीपाला, मुळ विक्रेते -१०/- प्रमाणे ६०% कपडेवाले इतर १५/- प्रमाणे ४०% होणाऱ्या रक्कमेचा ८०% वर अपसेंट किंमत असणार आहे.

तसेच विस्तारित भागातील बाजार परवानगी शिवाय ५०००/- प्रतिदिनी + २ महिने आगाऊ घेणे तसेच सांगली मिरजेसाठी २०,०००/- रुपये अनामत व तीन महिने रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

टिप्पणी क्रं. १ मध्ये मा. आयुक्तसो, यांचे दि. ११/०६/२०२४ रोजीच्या सुचनेनुसार
अ)महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग निहाय आठवडा बाजार यांची संख्या ३८३९ असून ३१ आठवडा बाजार आहेत.
ब) भालीपाला, फळ विक्रेते यांच्याकडून १०/- दैनंदिन परवाना शुल्क घेण्याचे असून, प्रभाग समिती निहाय असलेल्या संख्येनुसार प्रतिदिनी २३०३४/- इतकी रक्कम होत आहे. साधारणपणे एकूण व्यवसायीक यांच्या ६०% प्रमाणे ही रक्कम आहे.
क) कापड व्यवसायीक व अन्य विक्रेते यांच्याकडून १५/- प्रमाणे दैनिक परवाना शुल्क घेण्याचे असून, प्रभाग समिती निहाय असलेल्या संख्यानुसार प्रतिदिनी २३०३४/- इतकी रक्कम होत आहे. साधारणपणे एकूण व्यवसायीक यांच्या ४०% प्रमाणे ही रक्कम आहे.

३१ बाजारातील निश्चित केलेल्या जागे शिवाय अधिकरण जागेवरील व्यवसायीक यांच्याकडून दैनंदिन परवाना फी विनापरवानगी घेण्याची नाही. आठवडयास प्रतिदिनी ५०००/- प्रमाणे भरणा करुन २ महिने आगाऊ स्वरुपात भरण्याचा आहे.

ड) **सांगली आणि कुपवाड साठी** २६२४ व्यवसायीकासाठी १०/- प्रमाणे ६०% प्रमाणे १५७४४/- प्रतिदिनी तर १५/- प्रमाणे ४०% नुसार असे ३१४८८/- प्रतिदिनी होणार आहे. वार्षिक र.रु. १,१४,९३,१२०/- वर ८०% प्रमाणे र.रु. ९१,९४,४९६/- इतकी देकार रक्कम होत आहे.
ई) **मिरजसाठी** १२१५ व्यवसायीकसाठी १०/- प्रमाणे ६०% प्रमाणे र.रु. ७२९०/- १५/- प्रमाणे ४०% रक्कम रु. ७२९०/- असे प्रतिदिनी र.रु. १४५८०/- होणार आहे. वार्षिक र.रु. ५३,२१,७००/- होत असून, ८०% प्रमाणे र.रु. ४२,५७,३६०/- इतकी देकार रक्कम होत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाडसाठी एकूण ८०% देकार रक्कम रु. १,३४,५१,८५६/- इतकी होत आहे. तसेच र.रु. २०,०००/- अनामत व तीन महिने सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे भाजीपाला व फळ विक्रेते यांच्याकडून दैनंदिन परवाना फी र.रु. १०/- तर कापड व अन्य विक्रेते यांच्याकडून र.रु. १५/- प्रमाणे ५ X ४ जागेस दैनंदिन परवाना फी घेण्यासाठी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

All pages signed.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १४ **दिनांक :- १०/०६/२०२४**

विषय क्रमांक :- १४

सोबतचे अतिरिक्त आयुक्त,सांगली (बांधकाम विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये जागतिक बँक व महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र यांचेवतीने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंट मनपा क्षेत्रातील ११ नाल्यांचे खोलीकरण, रुंदीकरण, पक्के बांधकाम करणे, नाल्यांवरील असलेले अतिक्रमण हटविणे छोटे पूल बांधणे भोबे टाईप गटारी बांधणे या गटारीत येणाऱ्या पावसाचे पाण्याचा निचरा करणेसाठी शामरावनगर मध्ये दोन ठिकाणी पर्पोग स्टेशन बांधणे याद्वारे मनपा क्षेत्रातील नागरी वस्तीत पाणी साचून न राहता ते गतीने नदीत जावे यासाठी उपाय योजना करण्यात येणार आहेत. या साठी र.रू. ५२४० लक्ष मात्रचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करण्यात आला आहे. सदर निधीसाठी महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये नवीन लेखाशिर्ष निर्माण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रभारी अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १५ **दिनांक :-** १०/०६/२०२४

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता कर व इतर) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या कर विभागाकडून प्रत्येक वर्षी शास्ती रक्कमेमध्ये २५% सवलत देणेस मा.स्थायी समितीने मान्यता दिलेनुसार मा.आयुक्तसो यांनी वेळोवेळी प्रती वर्षी शास्ती मध्ये २५% सवलत दिली आहे.

तसेच, विशेष महासभा ठराव क्र.४७ दि.२८/०८/२०१७ अन्वये दंड व्याजामध्ये २५% सवलत पुढे तशीच कायम ठेवण्यात आली होती. त्यानुसार मालमत्ता धारकांना मालमत्ता कराची थकीत रक्कम एकरक्कमी भरणेस तयार असतील तर त्यांना सद्या दंड व्याजामध्ये २५% सवलत देणेत येते.

तथापि, उपरोक्त प्रमाणे सवलत देवूनही नागरिकांचा थकीत घरपट्टी भरणा करणेस पुरेसा प्रतिसाद मिळत नसल्यामुळे महापालिका उत्पन्नात घटच होत आहे. यासाठी यापुर्वी मालमत्ता धारकांना मालमत्ता कराच्या थकबाकी रक्कमेमध्ये देण्यात आलेली दंड व व्याजामध्ये २५% सवलत यापुढे बंद करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अधिक्षक (मालमत्ता कर)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- ०१/२०२४-२५

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- १६ **दिनांक :-** १०/०६/२०२४

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१०/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिंकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली हद्दीमधील न्यू प्राईड मल्टीप्लेक्स, सांगली समोरील मा.आयुक्तसो, यांचे बंगल्यास "उर्जा ~~बंगला~~" असे नामकरणाचा प्राथमिक इरादा व स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीकरण करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मालमत्ता विभाग
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका